**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

पुणे पोलीस

**प्रेसनोट क्र.११५ दि.१७/०१/२०२०**

## अंमली पदार्थ व खंडणी विरोधी पथक पुर्व विभाग गुन्हे शाखा
## " गांजाची चोरून विक्री करणारे महिलेस सापळा रचुन शिताफीने अटक"

अंमली पदार्थ व खंडणी विरोधी पथक पुर्व विभाग गुन्हे शाखा कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते, पोलीस उप निरीक्षक सुभाष तागड व स्टाफसह सिंहगड रोड पोलीस स्टेशन चे हद्दीत दि. १६/०१/२०२० रोजी १४.१५ वा. चे सुमारास, पुणे येथील ओंकार सप्लायर्स, तुकाईनगर, समर्थ नगर जवळ, तुकाई नगर चौक ते हिंगणे खुर्द कडे जाणारे रोडचे बाजुला सार्वजनिक ठिकाणाहुन जात असताना महिला नामे सौ. नंदा प्रकाश पवार, वय-५८ वर्षे, मु. दौडकरचाळ, समर्थ नगर, हिंगणे खुर्द, तकाई नगर जवळ, पुणे ही तिचे उजवे हातात कापडी पिशवी घेवुन लगबगीने जाताना दिसली. तिने पोलीस स्टाफला पाहताच घाबरून तेथून निघुन जात असताना तिचे बाबत संशय आल्याने तिची व तिचे ताब्यातील पिशवीची झडती घेतली असता तिचे ताब्यात कि.रु. २२,२००/-- चा ०१ किलो ११० ग्रॅम गांजा हा अंमली पदार्थ अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगताना मिळुन आली. म्हणुन तिचे विरुध्द सहायक पोलीस उप निरीक्षक मोहन साळवी यांनी सिंहगड रोड पोलीस स्टेशन गु.र.नं. २३/२०२० एन. डी. पी. एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब)(ii)(ब) प्रमाणे कायदेशीर फिर्याद देवुन त्यामध्ये तिस अटक करण्यात आली आहे.

त्याचप्रमाणे पोलीस उप निरीक्षक सुभाष तागड हे स्टाफ सह सिंहगड रोड पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये माणिकबाग परिसरात पेट्रोलींग करीत असताना पोलीस नाईक विशाल शिंदे यांना दासमुख शॉप मध्ये तंबाखुजन्य हुक्का फ्लेअर्स ची विक्री चालत असले बाबतची बातमी मिळालेने त्याबाबत कारवाई करून इसम नामे अब्दुल मोईद्दीन समद रा. कोथरूड यांचे दुकानामध्ये असलेले रू. ४३,१४५/- चा विक्रीस बंदी असलेले तंबाखुजन्य हुक्का फ्लेवर्स जप्त करून सिंहगड रोड पोलीस ठाणे खटला क्र. ४२/२०२० अन्वये खटला भरण्यात आला आहे.

तसेच पोलीस उप निरीक्षक हेमंत ढोले हे स्टाफ सह कोंढवा पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये एनआयबीएम रोड, कोंढवा परिसरात पेट्रोलींग करीत असताना सहायक पोलीस उप निरीक्षक अविनाश शिंदे यांना युनिक २ शॉप मध्ये तंबाखुजन्य हुक्का फ्लेअर्स ची विक्री चालत असले बाबतची बातमी मिळालेने त्याबाबत कारवाई करून इसम नामे रिझवान मोहम्मंद, रा. कॅम्प, पुणे यांचे दुकानामध्ये असलेले रू. ५८,२२०/- चा विक्रीस बंदी असलेले तंबाखुजन्य हुक्का फ्लेवर्स जप्त करून सिंहगड रोड पोलीस ठाणे खटला क्र. ४२/२०२० अन्वये खटला भरण्यात आला आहे. असा एकुण रू. १,०१,३६५/- चा विक्रीस बंदी असलेले तंबाखु जन्य हुक्का फ्लेवर्स अंमली विरोधी पथकाकडुन जप्त करण्यात आले आहेत.

सदरची कारवाई मा. अपर पोलीस आयुक्त, (गुन्हे) श्री अशोक मोराळे, मा. पोलीस उप आयुक्त, गुन्हे श्री. बच्चन सिंग, मा. सहायक पोलीस आयुक्त (अभियोग) श्री. विजय चौधरी, अंमली पदार्थ विरोधी पथक पुर्व विभागाचे प्रमुख पोलीस निरीक्षक राजेंद्र मोहिते यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस उप निरीक्षक सुभाष तागड, हेमंत ढोले, सहायक पोलीस उप निरीक्षक मोहन साळवी, अविनाश शिंदे, महिला पोलीस हवालदार मिना पिंजन, पोलीस हवालदार महेद्र पवार, शिवाजी राहिगुडे, पोलीस नाईक मनोज साळुंके, विशाल शिंदे, पोलीस शिपाई सचिन चंदन यांनी केली.